| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | २२/०२/२०२५ |
| २. | गुन्हा दाखल तारीख | २२/०२/२०२५ |
| ३. | दोषारोप दाखल तारीख | २९/०५/२०२५ |
| ४. | दोषारोप ठेवल्याची तारीख | २९/०५/२०२५ |
| ५. | संपरिक्षा चालु झाल्याची तारीख | ०८/०४/२०२६ |
| ६. | निकालीसाठी राखीव ठेवल्याची तारीख | ०५/०६/२०२६ |
| ७. | निकाल तारीख | ०५/०६/२०२६ |
| ८. | शिक्षा दिली असल्यास त्याची तारीख | नाही. |
| ९. | कालावधी | ०१ व. ०० म. ०७ दि. |
| १०. | जप्त मुद्देमाल | देशी दारुच्या ५३ बॉटल्या |

| अ. क्र. | आरोपीचे नाव | आरोपी अटक तारीख | आरोपीस जामीन दिल्याची तारीख | गुन्हा | आरोपीस शिक्षा /निर्दोष मुक्तता | शिक्षा | आरोपी बंदी असलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | क्रिष्णा विनायक बोरकर | सुचनापत्रावर सोडले | -- | म.दा.का. कलम ६५ (ई) | निर्दोष | नाही | नाही. |

## न्यायनिर्णय

## (घोषीत दिनांक ०५/०६/२०२६)

प्रस्तुतचा खटला आरोपी क्रिष्णा विनायक बोरकर याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५ (ई) नुसार चालला.

## मुद्दे व निष्कर्ष

२) विद्वान विशेष सरकारी वकील श्री. सी. आर. भोई आणि आरोपी तर्फे विद्वान वकील श्री. एम. व्ही. निकुरे यांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. उभय

पक्षांचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुद्दे विचाराधीन येतात. सदर मुद्यांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | | **निष्कर्ष** |
|---|---|---|---|
| १ | दिनांक २२/०२/२०२५ रोजी १८.२० वाजताच्या सुमारास मौजे गायत्री नगर, सिंदेवाही, ता. सिंदेवाही येथे आरोपीच्या राहते घरी, आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या ५३ नग देशी दारुच्या बॉटल्या ९० मि.ली. चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला व त्यायोगे त्याने महाराष्ट्र दारुबंदी कायद्याचे कलम ६५(ई) प्रमाणे गुन्हा केला ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | : | नाही |
| २ | अंतीम आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतुने साक्षीदार क्रमांक १ जप्ती पंच रामदास काशिनाथ मोहुर्ले यांना तपासले. अभियोगपक्षाला प्रकरणातील इतर साक्षीदार तपासण्याची वारंवार संधी देण्यात आली होती. परंतु, अभियोगपक्षाने वारंवार संधी देऊन देखील प्रकरणातील इतर साक्षीदार तपासले नाहीत. त्यामुळे, अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी १ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला आहे.

४) आरोपी विरुध्द गुन्हयाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपीचे कलम ३५१ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी १ वर पारित करण्यात आला आहे.

## मुद्दा क्रमांक ०१ करीता

५) साक्षीदार क्रमांक १ रामदास यांनी असे कथन केले की, दिनांक २२/०२/२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्कचे अधिकाऱ्यांनी त्यांना पंचनाम्याकरीता कुठेही

बोलाविले नव्हते. तसेच त्यांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. त्यांनी घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील त्यांची सही मान्य केली आहे. परंतु, त्यातील मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे.

६) अभियोगपक्षा तर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे बारकाईने अवलोकन करण्यात आले. अभियोगपक्षाच्या कथानकानुसार जप्ती पंच हा आरोपी विरुध्द कार्यवाही करतांना घटनास्थळी हजर होते. परंतु साक्षीदार क्रमांक १ रामदास यांनी त्यांच्या समक्ष आरोपीच्या ताब्यातुन पोलीसांनी काहीही जप्त केले नाही असे स्पष्टपणे कथन केले आहे. त्यामुळे त्यांच्या साक्षीचा अभियोगपक्षाला फायदा झाला नाही.

७) वर चर्चीलेल्या विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, सदर प्रकरणात जप्ती पंच साक्षीदार क्रमांक १ रामदास यांनी अभियोगपक्षास अनुकुल असे काहीही कथन केले नाही. त्यामुळे आरोपी विरुध्द स्पष्ट व सबळ पुरावा पटलावर उपलब्ध झाला नाही. सबब, आरोपीची सबळ पुराव्याअभावी मुक्तता करणे योग्य ठरेल. त्यामुळे मी अशा निष्कर्षास येतो की, अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द लावण्यात आलेला दोषारोप निःसंशयपणे सिध्द केला नाही. त्यामुळे दिनांक २२/०२/२०२५ रोजी १८.२० वाजताच्या सुमारास मौजे गायत्री नगर, सिंदेवाही, ता. सिंदेवाही येथे आरोपीच्या राहते घरी, आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररीत्या ५३ नग देशी दारुच्या बॉटल्या प्रत्येकी ९० मि.ली. एकुण किंमत रु.१८५५/- च्या चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने बाळगतांना मिळुन आला ही बाब अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केली नाही. सबब, मी मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ०२ करीता

८) वर नमुद केल्याप्रमाणे आरोपी हा सबळ पुराव्याअभावी प्रस्तुत प्रकरणातुन निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. संपुर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, राज्य उत्पादन शुल्कचे अधिकाऱ्यांनी देशी दारुच्या एकुण ५३ बॉटल्या जप्त केल्या होत्या. त्यापैकी एक बॉटली रासायनिक पृथ्थकरण अहवालासाठी प्रयोगशाळेत पाठविली होती. उर्वरीत ५२ देशी दारुच्या बॉटल्याबाबत आदेश पारित करणे गरजेचे आहे. आरोपीने नि.क्र.०७

वर निदर्शीका दाखल करुन त्याने पुर्वी दिलेली जमानत कायम ठेवण्याचे कथन केले आहे. प्रस्तुत प्रकरणात आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र असल्यामुळे त्याने पुर्वी दिलेली जमानत भा.ना.सु.स. कलम ४८१ प्रमाणे कायम ठेवणे न्यायोचीत ठरेल. यास्तव, मी मुद्दा क्र. ०२ चे संबंधाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी नामे क्रिष्णा विनायक बोरकर याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) च्या अपराधातुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम २७८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) दुय्यम निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क चिमुर-२, जि. चंद्रपुर यांना निर्देशीत करण्यात येते की, आव्हान कालावधीनंतर प्रस्तुत प्रकरणातील जप्त देशी दारुच्या प्रत्येकी ९० मि.ली. च्या एकुण ५२ बॉटल्या योग्य त्या कायदेशीर मार्गाने नष्ट करण्यात याव्यात.

३) आरोपीने पुर्वी दिलेली वैयक्तीक बंधपत्रे भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ४८१ च्या पुर्ततेकरीता आव्हान कालावधीपर्यंत कायम करण्यात येतात. सदर बंधपत्रे यापुढे सहा महिण्यापर्यंत कायम राहुन त्यानंतर रद्द समजण्यात येतील.

४) आरोपीने जामीनासाठी भरणा केलेली रोख अनामत रक्कम रु. ३००/-(रक्कम रु. तिनशे फक्त) (Vide Cr. C. D. No.27/2025 dt.29/05/2025) आव्हान कालावधी संपुष्टात आल्यानंतर त्याला परत देण्यात यावी. आरोपीने विहीत मुदतीत अर्ज न केल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

PANDURANG ANKUSH GHOTE

Digitally signed by PANDURANG ANKUSH GHOTE
Date: 2026.06.05 16:21:46 +0530

दिनांक :- ०५/०६/२०२६. **(श्री. पा. अ. घोटे)**

स्थळ :- सिंदेवाही. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, सिंदेवाही.